# मौल्यवान आठवणी - भाग १

पोस्टमनची वाट पहात माझ्या आंतबाहेर फेऱ्या चालू होत्या. आज आईचे पत्र येणार ह्याची जणू खात्रीच होती. माझ्यांतील १९ वर्षाची मुलगी आतुरतेने आईच्या पत्राची वाट पहात होती. आठ महिन्याच्या लीनताचे रडणे ऐकताच माझ्यांतील आई जागी झाली आणि मी पट्कन बेडरुममध्ये पळाले. आतां दूध पिण्याची पण वेळ नाहीय. मग कां रडत असेल? की हिला पण माझ्यासारखा आईचा ध्यास लागलाय? आंत जाऊन पहाते तर काय, बाईसाहेबांनी प्रोग्रॅम करुन ठेवलेला. मग तिचे डायपर बदलले आणि परत क्रिबमध्ये ठेवले आणि म्युझिकल मोबील लावले. डॉ. स्पॉकच्या चाईल्ड केअर पुस्तकाची मी गरोदरपणी बरीच पारायणं केली होती. लहान मुलांना काही कारण नसतांना उगीच घेऊन बसू नये. नाही तर त्यांना घेण्याची संवय लागते आणि बाकीची काम खोळंबून रहातात. लीनता म्युझिकच्या तालावर हातपाय हलवू लागली. हंसायला लागली. ते पाहून मी परत फ्रंटडोअरकडे पळाले. एव्हांना पोस्टमन येऊन गेला होता. पोस्टबॉक्समध्ये निळं एअरलेटर पाहून मन अगदी हरखून गेले. कधी एकदां आईचे पत्र वाचेन असे झाले होते. आणि एअरलेटरवरील अक्षरं अनोळखी दिसली. जीव हिरमुसला झाला.

परत एकदां पत्राकडे पाहिले. कोणी लिहिले ते पाहिले आणि आश्यर्यचकीत झाले. बाबूजींचे, सुधीर फडकेंचे पत्र ! आणि आपल्याला ? आपली तर त्यांच्याशी विशेष ओळख पण नाहीय. नाही म्हणायला मेडीकल कॉलेजमध्ये असतांना ह्यांनी बाबूजींचे कार्यक्रम आंखले होते हे पटकन् आठवले. त्यामुळे बाबूजींनी पत्र पाठवले चारपांच वर्षानंतर ? हे म्हणजे सुतावरुन स्वर्गांत गेल्यासारखे झाले हं. मग पत्रांत काय मजकूर असेल बरं ? विचार करीत करीतच मी पत्र उघडले. आधी उभ्याउभ्याच आधाशासारखे मजकूरांवरुन डोळे फिरवले. मग आरामखुर्चीत निवांतपणे बसून पत्र वाचले. बाबूजींनी विनंती केली होती पत्रांत. आम्ही त्यांना अमेरीकेत येण्यासाठी स्पॉन्सर करु शकू कां ? असे अगदी अदबीने विचारणा केली होती. बाबूजी तुमचा आमच्यावर हक्क आहे. तुम्ही हक्काने सांगू शकता. आणि माझे मन भूतकाळांत शिरले.

सात मे एकोणीशसे सदुसस्टला मी जे एफ् के अेअर पोर्टवर पाउल ठेवले. इमिग्रेशन चेक नंतर माझे सामान कनव्हेअर बेल्टवरुन काढले आणी कस्टमकडे वळले. कस्टम ऑफिसरने विचारलेला एकही प्रश्न कळला असेल तर शपथ. त्या ऑफिसरकडे सतरा वर्षाची टीनेजर वेंधळ्यासारखी पहातेय ते पाहून त्याला माझी दया आली असावी. त्याने "यु मे गो" म्हटले. तरी मी तेथेच उभी. शेवटी त्याने दरवाज्याकडे बोट दाखविले तेव्हां कोठे अस्मादिकांच्या डोक्यांत प्रकाश पडला आणी मी पट्कन् बाहेर जाण्यासाठी वळले. त्याने विचार बदलण्याआधी बाहेर पडलेले बरे. नाहीतर मी आणलेले पापड,

मसाले, डाळी वगैरे तो घ्यायचा.

बाहेर येण्याआधी काकांनी सांगितल्याप्रमाणे पर्समधून ह्यांचा फोटो काढला. नाहीतर भलत्याच माणसाचा हात धरुन जाशील ? अर्थांत मी तसे कांही केले नसते म्हणा. पण...........मुंबईला २३ डिसेंबरला सकाळी पहाण्याचा प्रोग्रम झाला. नंतर ह्यांनी आणखी एकदोन मुली पाहिल्या आणी रात्री निरोप आला. आम्हांला मुलगी पसंत आहे. तुम्हाला मुलगा पसंत असेल तर कळवा आणि सव्वीसला लग्न उरकू या कारण मुलाला त्याच रात्री अमेरीकेत परत जायचे आहे. काकांना माझी संमती मिळताच त्यांनी निरोप पाठविला. लग्न झाले. आणी ह्यांनी चारपांच दिवस सुट्टी वाढवली टेलिग्रॅम पाठवून. मग आम्ही नागपूर, चंद्रपूर करीत अहेरीला आलो. तेथे एक दिवस राहून हे अमेरिकेत आले आणी मी पंधरा दिवस राहून, पहिल्या संक्रांतीचे वाण करुन माझ्या माहेरी गुलबर्ग्याला गेले. म्हणजे चारपांच दिवसाच्या प्रवासानंतर आज मी ह्यांना भेटणार. त्यामुळे काकांचा सल्ला शिरसावंद्य मानायचे ठरवून मी ह्यांचा फोटो बाहेर काढला. कशाला चान्स घ्या उगीच. (आतां वाटतय की चान्स घ्यायला काही हरकत नव्हती). बाहेर येते न् येते तोच ह्यांची हांक ऐकू आली. आणी पाठोपाठ एका सुंदर, गोऱ्यापान उंच्यापुऱ्या माणसाचे उद्गार कांनी पडले. अम्मा यार कितने लकी हो तुम. तुमने तो लॉटरीही जीत ली ! आणि मी लाजून चुर्र. ह्यांनी माझी ओळख करुन दिली. हे डॉक्टर कुकर. मी सर्जरीमध्ये तर हा इंटरनल मेडिसीनमध्ये रेसिडेंन्सी करीत आहे. मी हांत जोडून नमस्कार केला आणी नजर वळवली. उगीच आणखी एखादा रिमार्क नको ऐकायला. पण हा कुठे सोडतो मला. भाभीजी शरमा गई. ह्यांनी म्हटलं, ह्याच्याकडे दुर्लक्ष कर. हा असाच विनोदी आहे पण मनाने निर्मळ आहे. ते ऐकून जीव भांड्यांत पडला. आणि ह्यांनी माझा हांत धरला. लाजून मी हळूंच माझा हांत ह्यांच्या हातांतून सोडवून घेतला. तेही डॉक्टर कुकरच्या लक्षांत आले असावे. कारण त्यानंतर बरेचदा त्यांनी मला चिडवण्यांत कसर सोडली नाही. आम्ही घरी आलो. घर म्हणजे आमचे वन् बिएचकेचे अपार्टमेंट. ह्यांनी स्वयंपाकघर, लिवींगरुम आणी बेडरुम दाखवली. आणि ग्रामोफोन लावला. आणि काय चमत्कार बाबूजींचा सुमधूर आवाज कांनी पडला. "तोच चंद्रमा नभांत तीच चैत्र यामिनी". आणि पहिल्यांदा माझ्या लक्षांत आले की मी परदेशांत, सात समुद्रापलिकडे, माझ्या आईवडीलांना, भावंडांना सोडून जरी आले असले तरी मी माझ्या घरी आले आहे. आणि माझ्या मनावरच दडपण एकदम हलकं झालं. मनोमनी मी बाबूजींचे आभार मानले. आणी आज त्याच बाबूजींचे पत्र हातांत आहे माझ्या.

(क्रमश:)

**सुरेखा मद्दीवार.**